अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :- ०५.१२.२०२३

**-: प्रेसनोट :-**

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ३७/२०२३ |
| ३ | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम -१९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | श्री. प्रदीप गजाराम फडतरे, वय ५७ वर्षे, धंदा-नोकरी (पोलीस शिपाई क्र. ०६-१६८९), नेमणुक मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई. |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये २०,०००/-. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रूपये १०,०००/- |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रूपये १०,०००/- |
| ८ | थोडक्यात हकीगत | दिनांक २७/११/२०२३ रोजी यातील फिर्यादी व त्यांचे मित्र मानखुर्द येथील देशी बार मध्ये दारु पिण्यासाठी गेले असता, फिर्यादी यांचे मित्र व बार मॅनेजर यांच्यात काही कारणावरुन बाचाबाची झाली. सदरवेळी फिर्यादी यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, बार मॅनेजरने त्यांचेसोबतही हुज्जत घालुन वादावादी केली. त्यानंतर फिर्यादी व त्यांचे मित्र तेथुन निघुन गेले.<br><br>दुसऱ्या दिवशी मानखुर्द पोलीस ठाणे येथुन यातील लोकसेवक यांनी फिर्यादी यांना फोन करुन पोलीस ठाणेस येण्यास सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी पोलीस ठाणेस गेले असता, लोकसेवक यांनी फिर्यादी यांना फिर्यादी व त्यांच्या मित्राविरोधात बार मॅनेजरने तक्रार केली असल्याने, फिर्यादी यांना मोठया केसमध्ये अडकविणार असल्याचे सांगुन, त्यातुन सुटका हवी असल्यास रु. २०,०००/- लाच दयावी लागेल असे सांगितले. फिर्यादी यांना नमुद लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी दिनांक ०४/१२/२०२३ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरुध्द लेखी तक्रार केली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/१२/२०२३ रोजीच्या पडताळणी/सापळा कारवाईदरम्यान यातील लोकसेवक यांनी पंचासमक्ष रु. २०,०००/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. १०,०००/- लाचेची रक्कम स्विकारल्याने लोकसेवकास रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून लोकसेवका विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

मार्गदर्शन अधिकारी - श्री. विजय पाटील, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग.

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०

संकेतस्थळ-acbmaharastra.gov.in

ईमेल- 1) acbwebmail@mahapolice.gov.in, 2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

ऑनलाईन तक्रार अर्ज-www.acbmaharastra.net. **टोल फ्रि. क्र.** १०६४

दुरध्वनी क्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned with OKEN Scanner